लोकमत

म्हसदीच्या देवरे महाविद्यालयात आयोजित 'ग्रामालोक' कार्यक्रमात डॉ. नरेंद्र पाठक

# राष्ट्रहित, सामाजिक स्थैर्याच्या भूमिकेतून व्हावी साहित्याची निर्मिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**म्हसदी :** साहित्यिक हा समाजाचा एक महत्त्वाचा घटक आहे. ग्रामीण भागातील लोकांचे प्रश्न साहित्यिकांनी कथा, कविता, कादंबरी यातून मांडावेत. जमिनीशी नाळ जोडणे म्हणजे कृतज्ञता होय. सामाजिक व राष्ट्रहित घडविण्याच्या दृष्टीने साहित्यिकांनी साहित्याची निर्मिती करावी, असे मत साहित्य अकादमी नवी दिल्ली केंद्रीय कार्यकारिणी मंडळ सदस्य डॉ. नरेंद्र पाठक यांनी व्यक्त केले.

म्हसदी येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय भाषा मंडळ आणि साहित्य अकादमी नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने 'ग्रामालोक' या साहित्यिक उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ.पाठक बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक कुणाल संजयकुमार देवरे होते. यावेळी शशिकांत घासकडबी, माजी प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, नरेंद्र खैरनार, डॉ. सविता पटेल, प्रशांत बागुल, प्रवीण पवार, सुभाष अहिरे यांच्यासह देऊर येथील ग्रामस्थ उपस्थित होते. दीपप्रज्वलन करून ग्रामालोक कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यावेळी संचालक कुणाल देवरे, प्राचार्य डॉ.संजीव गिरासे यांनी मनोगत व्यक्त




आर. डी. देवरे महाविद्यालय 'ग्रामालोक' कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. नरेंद्र पाठक, कुणाल देवरे, प्राचार्य डॉ.संजीव गिरासे, शशिकांत घासकडबी, डॉ. एस. आर. पाटील, नरेंद्र खैरनार, डॉ. सविता पटेल आदी.

## कवितांचे सादरीकरण

या बहुभाषिक काव्य संमेलनात धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील २० कवींनी मराठी, हिंदी, इंग्रजी, व अहिराणी भाषेतील कविता सादर केल्या. यात कवी कुणाल देवरे (वेदना आणि सुख), प्रशांत बागुल (नेता मात्र बरळतो), प्रवीण पवार (भूक), नरेंद्र खैरनार (बा जोतिबा), सुभाष अहिरे (पैसा कोणा संगे येत नाही), तर डॉ. सविता पाटील यांनी 'शिक्षण मंत्र्यांना पत्र' या कवितांचे सादरीकरण केले

केले.

सूत्रसंचालन प्रा.जगदीश वाघ यांनी केले, तर आभार प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांनी मानले. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात देऊर जि.प. मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांनी खानदेश लोकधारा हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. त्यातून खान्देशातील लोकसंस्कृतीचे दर्शन घडले. तर तिसऱ्या सत्रात निमंत्रित कवींचे बहुभाषिक काव्य संमेलन संपन्न झाले. या संमेलनाचे उद्घाटन नंदुरबार येथील शशिकांत घासकडबी यांच्या हस्ते झाले.

या काव्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील होते तर प्रमुख पाहुणे म्हणून देऊर येथील सरपंच पुनम देसले, उपसरपंच काशिनाथ माळी, पोलिस पाटील मनोज खोंडे, सुदाम देसले, रावसाहेब देसले, भटू साळवे, हंसराज देसले, अमर देसले, सतिश देसले, प्रेमसिंग गिरासे आदी उपस्थित होते. या बहुभाषिक काव्य संमेलनाचे काव्य संचालन कवी रावसाहेब कुवर यांनी केले. याप्रसंगी त्रिशिला साळवे, प्रमिला मराठे, गुलाबराव मोरे, वेदराज कपाटे, दत्ता कल्याणकर, अशोक तोरवणे, आधार चव्हाण, दिलीप लोखंडे, रामदास धोंडगे, रोहित ठाकूर, नितीन अहिरराव या कवींनी आपल्या स्वरचित कविता सादर केल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. वाल्मिक आढावे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ.मिलिंदकुमार देवरे व डॉ.विजय जाधव यांनी केले तर आभार डॉ.हेमंतकुमार पाटील यांनी मानले. कार्यक्रमासाठी सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह मराठी शाळेचे मुख्याध्यापक गोविंदराव नेरकर, सोमनाथ देवरे, मनिषा पाटील यांचे सहकार्य लाभले.